## "फिलाडेल्फिया'त "बृहन्महाराष्ट्र मंडळा"चे अधिवेशन

पुणे, ता. ७ - देशाबाहेरील मराठी मंडळींना मोठ्या संख्येने एकत्र आणणारे, व्यापार- उद्योग आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांना सादरीकरणाची संधी देणारे "बृहन्महाराष्ट्र मंडळा"चे १४ वे अधिवेशन अमेरिकेत फिलाडेल्फिया येथे दोन ते पाच जुलैदरम्यान आयोजित करण्यात आले आहे.
भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम, अमेरिका - भारत व्यापार परिषद, व्यावसायिक शिक्षण परिषदांचे आयोजन, बिझनेस फोरम ही या अधिवेशनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि फिलाडेल्फिया मराठी मंडळ यांच्यातर्फे संयोजक मुकुंद कुटे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी सहसंयोजक मंदार जोगळेकर, सल्लागार मोहन रानडे, मंडळाचे अध्यक्ष गिरीश ठकार, कार्यक्रम समितीचे किरण जोगळेकर, धनंजय दातार; तसेच "इनोव्हेशन्स"च्या प्रतिमा किर्लोस्कर आदी उपस्थित होते. "पेनसिल्व्हानिया कन्व्हेन्शन सेंटरमध्ये अत्याधुनिक सुविधांनी युक्त अशा अडीच लाख चौरस फूट क्षेत्रात हे अधिवेशन होणार आहे. शिवाय "द ग्रॅंड हॉल", "द ग्रॅंड बॉल रूम", तीन प्रदर्शन दालनेही अधिवेशनासाठी सज्ज आहेत,' असे ते म्हणाले.

""मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्‌घाटन होणार असून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे प्रमुख पाहुणे असतील. कल्याणी समूहाचे अध्यक्ष बाबा कल्याणी अधिवेशनाचे बीजभाषण करणार आहेत. स्वामी दयानंद सरस्वती, शंकर अभ्यंकर, स्वामी माधवानंद व ज्येष्ठ अभ्यासक उपस्थित राहणार असून ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले मराठी आणि हिंदी गीतांचा "मी आशा' हा कार्यक्रम सुदेश भोसले यांच्यासह सादर करणार आहेत. दोन जुलैला होणाऱ्या "व्यापार परिषदे"चे प्रमुख पाहुणे किर्लोस्कर ब्रदर्सचे संजय किर्लोस्कर असून "पर्यावरण पुढाकार', "आंतरराष्ट्रीय व्यापार', "निर्यात व्यवहार कायदा', "परदेशांतील उद्योगांचे संपादन' आदी विषयांवर तज्ज्ञांची चर्चासत्रे, व्याख्याने होणार आहेत," असे कुटे यांनी सांगितले.

""व्यावसायिकांच्या परिषदेत डॉक्टर, औषधनिर्माते, उपचारतज्ज्ञ, वैद्यकीय उपकरणे पुरवणारे; तसेच ज्येष्ठ नागरिक सहभागी होणार आहेत. "सन्माननीय वृद्धत्व' या विषयावर खास परिषद होणार आहे. तीन दिवसांचा "अमेरिका- भारत व्यापार मेळा' हेही अधिवेशनाचे आकर्षण ठरेल. या प्रदर्शनात अडीचशेहून अधिक दालने असतील. भारतातून सुमारे पाचशे व्यापार प्रतिनिधी यासाठी उपस्थित राहतील. पुण्यातून सुमारे चारशे प्रतिनिधी नोंदणी करतील," अशी माहिती त्यांनी दिली.

सांस्कृतिक आकर्षणे
"अवघा रंग एकचि झाला' हे संगीत नाटक
शौनक अभिषेकी, राहुल देशपांडे यांचा कार्यक्रम
अर्चना जोगळेकर यांचा "विश्वनायिका'
"कलाकार मित्रांचा सुरेल कट्टा'
काय सांगू बाई हे मराठी लावणी नाट्य